**महाराष्ट्र शासन**

डीएमयु/ 2020/ सीआर,92/DisM-1

## राज्य शासनाने कोव्हीड-19 विषाणूचे संक्रमण रोखण्यासाठी केलेल्या निर्बंधात्मक आदेशाबाबत वारंवार विचारले जाणारे प्रश्न.

| | | |
|---|---|---|
| 1 | सुपरमार्केट किंवा माल्स जसे की, डी-मार्ट, बिग बाजार, रिलायन्स सुरु राहतील काय ? | शासनाने दिलेल्या दि. 04.04.2021 व दिनांक 05.04.2021 च्या आदेशानुसार जीवनावश्यक वस्तंची विक्री करणा-या कोणत्याही आस्थापना/दुकाने कोव्हीड-19 संबंधीत नियमांचे पालन करुन सकाळी 07.00 ते रात्री 08.00 या वेळेत सुरु राहतील. परंतु जर सदर आस्थापना एका पेक्षा अधिक वस्तुंची विक्री करीत असेल व त्यामध्ये काही वस्तु जीवनावश्यक वस्तुंमध्ये मोडत नसतील तर तो विभाग बंद राहील. |
| 2 | आठवडी लॉकडाऊन (शनिवार व रविवार) मध्ये कोणत्या बाबी सुरु राहतील आणि कोणत्या बाबी बंद राहतील ? | जीवनावश्यक सेवांच्या अंतर्गत वर्गीकृत सर्व बाबी सुरु राहतील. यापुर्वीच्या आदेशामध्ये नमुद केलेल्या अत्यावश्यक सेवांच्या वैध कारणांशिवाय कोणतीही व्यक्ती घराबाहेर पडणार नाही. |
| 3 | आठवडी लॉकडाऊन दरम्यान कृषी उत्पन्न बाजार समिती सुरु ठेवता येतील काय ? | होय, कोव्हीड-19 संबंधीत नियमांचे पालन करुन सुरु ठेवता येतील. जर कोव्हीड-19 संबंधीत नियमांचे पालन करीत नसेल आणि विषाणूचा संसर्ग होऊ शकतो अश्या कारणामुळे कृषी उत्पन्न बाजार समिती राज्य शासनाच्या परवानगीने बंद करण्यात येईल. |
| 4 | बांधकामाशी संबंधीत साहित्यांची दुकाने/आस्थापना सुरु राहु शकतील काय ? | नाही. |
| 5 | वाहतुकीशी संबंधीत गॅरेज सुरु ठेवता येतील ? वाहनांच्या स्पेअर पार्टची दुकाने सुरु राहतील काय ? | वाहतुक करणा-या वाहनांशी संबंधीत गॅरेज सुरु राहु शकतील. इतर दुकाने बंद राहतील. जर कोणतेही गॅरेज कोव्हीड-19 संबंधीत नियमाचे पालन करीत नसतील अशी गॅरेज कोव्हीड-19 रोगाची साथ असेपर्यंत बंद करण्यात येईल. |
| 6 | केंद्र शासनाचे कर्मचारी, सार्वजनिक क्षेत्रातील कर्मचारी यांना अत्यावश्यक सेवेतील कर्मचारी संबोधता येतील काय ? | नाही. सर्वच केंद्र शासनाचे कर्मचारी, सार्वजनिक क्षेत्रातील कर्मचारी यांना अत्यावश्यक सेवा प्रदाता म्हणुन मानले जाऊ शकत नाही.<br>तथापी अत्यावश्यक सेवा म्हणुन वर्गीकृत असलेल्या सेवांमधील केंद्र शासनाचे/सार्वजनिक क्षेत्रातील कर्मचारी अत्यावश्यक सेवा प्रदात्याच्या कक्षेत येतील. |
| 7 | नागरीक मद्य खरेदी करु शकतील काय ? | ही बाब चंद्रपूर जिल्हयांकरीता लागु असणार नाही. |
| 8 | घरपोच सेवेकरीता मद्यांची दुकाने सुरु ठेवता येतील काय ? | |
| 9 | रस्त्यांचे कडेला असलेले धाबा सुरु राहतील काय ? | होय, परंतु रेस्टारंट करीता असलेले नियम लागु राहतील. बसुन खाण्याची परवानगी नसेल फक्त पार्सल घेऊन जाण्याकरीता परवानगी असेल. |
| 10 | घरगुती विद्युत उपकरणे (ए.सी, कुलर, फ्रिज) दुरुस्ती करणारे दुकाने चालु राहु शकते काय ? | नाही. |

| | | |
|---|---|---|
| 11 | दुरसंचार साधने (डेक्सटॉप/लॅपटॉप, मोबाईल) दुकाने खुली राहु शकतात काय ? | नाही. |
| 12 | विविध शासकीय सेवांसाठी एक खिडकी योजने अंतर्गत सेवा पुरविणा-या संस्था जसे की, आपले सरकार सेवा केंद्र, सेतु, सी.एस.सी. सेंटर, सेतु केंद्र, पासपोर्ट सेवा केंद्रांतील सेव अत्यावश्यक सेवा म्हणुन राहतील काय ? | होय, सदर आस्थापना आठवडयाच्या दिवशी (सोमवार ते शुक्रवार) सकाळी 07.00 ते रात्री 08.00 पर्यंत सुरु राहु शकतात. |
| 13 | रात्री 08.00 ते सकाळी 07.00 आणि शनिवार व रविवार रोजी रेस्टारंटव्दारे घरपोच सेवा सुरु राहतील काय ? | चंद्रपूर जिल्हयातील उपहारगृहे सोमवार ते शुक्रवार या दिवशी ग्राहकांना बसुन सुविधा न देण्याच्या अटीवर सकाळी 07.00 ते रात्री 08.00 वाजेपर्यंत सुरु राहतील. व या कालावधीत ग्राहकांना पार्सल सेवा देता येईल, निर्धारीत वेळेनंतर पार्सल सुविधा तसेच शनिवार व रविवार या दिवशी पार्सल सुविधा बंद असेल. परंतु ई-कॉमर्स च्या माध्यमातून घरपोच सेवा सकाळी 07.00 ते रात्री 08.00 या कालावधीत सुरु राहतील. |

जिल्हादंडाधिकारी तथा जिल्हा दंडाधिकारी कार्यालय ★ चंद्रपूर ★

स्वा/-

(अजय गुल्हाने)

**जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष**

**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, चंद्रपूर**

**प्रतिलीपी :- माहितीस सविनय सादर.**

1. पोलीस अधिक्षक, चंद्रपूर
2. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, चंद्रपूर
3. आयुक्त, चंद्रपूर शहर महानगरपालीका, चंद्रपूर
4. जिल्हा माहिती अधिकारी, चंद्रपूर
5. उपविभागीय दंडाधिकारी (सर्व)
6. तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी (सर्व)
7. संवर्ग विकास अधिकारी, पंचायत समिती (सर्व)
8. मुख्याधिकारी, नगर परिषद/नगर पंचायत (सर्व)

**<u>सदर प्रश्नावलीस उपरोक्त अधिकारी यांनी प्रसिध्दी द्यावी.</u>**

जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष

**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, चंद्रपूर**